# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD
## SUB-REGIONAL OFFICE, CHANDRAPUR

Phone: 07172-251965/272410
Fax: 07172-251965
Visit us at www.mpcb.gov.in
E-mail: srochandrapur@mpcb.gov.in

MAHARASHTRA
"Your Service is our Duty"

Sub-Regional Office
Udyog Bhavan, Ist Floor
Railway Station Road,
Chandrapur-442401

No. MPCB / SROC / 1265 / 2022 Date: 08 / 03 / 2022

To,
The Joint Director (WPC),
M. P. C. Board, Sion (E),
Mumbai-22.

O/C

Sub:- Minutes Of The Public Hearing For Proposed Sand Ghats (Total 51) Of Chandrapur District.

Ref:- 1) Board's Office Order No. E-05 of 2021 dated 21/01/2022 regarding Panel.
2) Public Hearing conducted on 25/01/2022 at Niyojan Bahvan, Collector Office, Chandrapur.

Sir,

With reference to above cited subject matter, District Mining Officer, Chandrapur had applied to the Board for conducting Environmental Public Hearing for their Proposed Project of Sand Ghats (Total 51) of Chandrapur District.

The Public Hearing was conducted on 25/01/2022 at 12:30 PM at Collector Office, Chandrapur, Tal. Dist. Chandrapur. Submitting herewith the copies of proceedings of the Public Hearing as under;

1) Minutes of Public Hearing in English & Marathi (One original Copy & one photocopy).
2) Copies of written submissions received regarding project.
3) Copy of attendance sheet.
4) DVD of video shooting at the time of Public Hearing.
5) Office order for constitution of Public Hearing Panel.
6) Notices of Public Hearing published in English & Marathi Newspapers.
7) Executive Summary (English & Marathi).
8) EMP Report.

This is submitted for your perusal and onward submission.

Thanking you.

Yours Faithfully
UBBhadule
(U. B. Bhadule)
I/c. Sub-Regional Officer, Chandrapur.

Copy submitted for information to:-
1) The District Collector, District Collector Office, Chandrapur.
2) Regional Officer, M. P. C. Board, Chandrapur.
3) EIC, M. P. C. Board, Mumbai – for display on website of the Board.

Copy for information to:-
District Mining Officer, Collector Office, Chandrapur.

Dt. 16/3/2022
आवक लिपीक
जल्हाधिकारी, चंद्रपूर

16/03/2022
आवक – जावक
खनिज शाखा
जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर

**जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, ता. जि. चंद्रपूर यांच्या प्रास्तावित ५१ रेतीघाटांच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर व जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आली.**

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **२५/०१/२०२२** |
| **वेळ** | **:** | **दुपारी १२.३० वाजता** |
| **स्थळ** | **:** | **नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर,** |

**प्रस्तावना:-**

जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, ता. जि. चंद्रपूर, यांनी चंद्रपूर जिल्हयातील सन २०२१-२२ वर्षाकरिता वाळू/रेती घाटांचे लिलाव करण्यासाठी प्रास्तावित ५१ (१.०० ते ५.०० हेक्टर) वाळू/रेती घाटांना पर्यावरणीय मंजूरीकरिता पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अर्ज सादर केला. प्रकल्प व्यवस्थापनाने पर्यावरण विषयक जनसुनावणीसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे उपरोक्त प्रकल्पाकरीता अर्ज केल्यावर मप्रनि मंडळ, चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने दि. २५/०१/२०२२ ही तारीख निश्चित करण्यात आली. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदी प्रमाणे सदर जनसुनावणीची जाहीर सुचना, म.प्र.नि. मंडळाने दि. २४/१२/२०२१ रोजीच्या मराठी दैनिक "लोकमत" व इंग्रजी दैनिक "द टाईम्स ऑफ इंडिया" या वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द केली. वृत्तपत्रातील जाहीर सुचनेच्या जाहिरातीद्वारे सर्व संबंधित व्यक्तींना त्यांच्या सुचना, टीका-टिप्पणी, विचार, आक्षेप इत्यादी या कार्यालयाकडे नोंदविण्याबाबत आवाहन करण्यात आले होते.

या प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशाची इंग्रजी व मराठी प्रत खालील कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनाकरीता/ संबंधितांच्या अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.

४. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
६. जिल्हा परिषद, चंद्रपूर.
७. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
८. जिल्हातील संबंधित ५१ ग्रामपंचायत कार्यालये जसे की, पळसगांव, विठ्ठलवाडा, येनबोथला, हिवरा, कुलथा, आर्वी, बामर्डा, वाकल, कळंबगांव तुकूम, कळंबगांव गन्ना, मोहाडी, विरव्हा, लाडबोरी, सरडपार(सिंदेवाही), सरांडी, राळेगांव रिठ, मांगली रै., चकनलेश्वर, चकदहेगांव-२, बोरचांदली, मरेगांव, सरडपार(चिमूर), उसेगांव, हळदा-२, आवाळगांव, चिंचगांव, रनमोचन, बोढेगांव, खरकाडा, सोंद्री, नकोडा, सामदा बुज, मुल-आकापूर, चिचाळा, चक दहेगांव, नलेश्वर, चितेगांव, सुशी दाबगांव, येरगांव, भेजगांव, राजोली, उश्राळा चक, काग, गोंदेडा, करंजी, तुळाना क्रं-१, तुळाना क्रं.-२, कोळशी खु., तामसी रिठ, अजयपूर, गोंडसावरी, खांबाडा, मनगांव, जि. चंद्रपूर.
९. सर्व उप-विभागीय कार्यालये, नगर परिषद, तहसिल कार्यालये, पंचायत समिती कार्यालये, जि. चंद्रपूर.

वरील अनुक्रमांक ५ ते ९ वर नमूद शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर या जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिद्धी देण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच जाहीर जनसुनावणी बाबत अधिसूचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरूपात प्रसिध्दी देण्यात आली जेणेकरुन प्रकल्पामुळे बाधित अथवा संबंधित व्यक्तीना त्यांचे आक्षेप, टिका टिप्पणी, विचार अथवा सुचना संबंधित नियामक प्राधिकरणास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. १४/०९/२००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकनअधिसूचने नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत केली.

१) श्री. विशालकुमार मेश्राम, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर - **अध्यक्ष,**

२) श्री. अ. मा. करे, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर - **सदस्य**

३) श्री. उमाशंकर भ. भादुले, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर - **समन्वयक**

सदर प्रकल्पाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी, आक्षेप, निवेदन, प्रश्न व जनसुनावणी दरम्यान एकूण उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी गठीत केलेल्या समितीचा आदेश अनुक्रमे सहपत्र-२ व ३ प्रमाणे सोबत जोडलेले आहे.

चंद्रपूर जिल्हयातील खालील तक्त्यात नमूद प्रस्तावित वाळू घाटांकरीता (एकूण ५१) पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दि. २५/०१/२०२२ दुपारी १२.३० वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे घेण्यात आली.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरुवातीस समन्वयक तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी अध्यक्ष व उपस्थित अभ्यगतांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहीती दिली. त्यांनी सांगितले की, १४/०९/२००६ व सुधारीत दि. ०१/१२/२००९ च्या अधिसुचने मधील दिल्याप्रमाणे सदर जनसुनावणीची प्रक्रीया करण्यात आली आहे. त्यांनी उपस्थितांना पर्यावरण विषयक सुचना, विचार, आक्षेप इत्यादी घेऊन पुढे यावे अशी विनंती केली. तसेच त्यांनी हि सुनावणी सर्व संबंधित लोकांसाठी आयोजीत केलेली आहे जेणेकरुन त्यांचे पर्यावरण विषयक प्रश्न/शंकाचे निरसन करण्यात येईल असे सांगितले. तद्नंतर त्यांनी जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांना जनसुनावणीची कार्यवाही सुरु करण्याबाबत विनंती केली.

जनसुनावणी समितीचे अध्यक्ष तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी उपस्थित जनसमुदायास, सांगितले की -
जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, ता. जि. चंद्रपूर, यांच्या चंद्रपूर जिल्हयातील सन २०२१-२२ वर्षाकरिता वाळू/रेती घाटांचे लिलाव करण्यासाठी प्रास्तावित ५१ (१.०० ते ५.०० हेक्टर) वाळू/रेती घाटांना पर्यावरणविषयक प्रस्तावाबाबत आपल्या सुचना, विचार,आक्षेप घेऊन पुढे यावे अथवा त्या लेखी स्वरुपात मांडाव्यात, आपण व्यक्त केलेले मत तसेच सुचना व आक्षेप या अधिसूचनेत नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना कळविण्यात येतील, सदर सुनावणीचे छायाचित्रीकरण(व्हिडीओ शुटींग) म.प्र.नि.मंडळाकडुन कायद्यातील तरतुदी प्रमाणे करण्यात येत आहे. तसेच प्रत्येकाने आपले प्रश्न विचारण्यापुर्वी आपले नाव व पत्ता सांगावा जेणे करुन सुनावणीच्या इतिवृत्तांत बनविते वेळी नमुद करण्यात येतील. त्यानंतर त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहीती उपस्थितांना देण्यात यावी तसेच त्यांनी प्रकल्पाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांचे शंकानिरसन करावे अशी सुचना केली.

तद्नंतर प्रकल्पधारकाच्या वतीने श्री. किशन पंडीत शर्मा, पर्यावरण सल्लागार यांनी सदर प्रस्तावित प्रकल्पांबाबत पर्यावरण विषयक केलेला अहवाल (PPT Presentation) सादर केला. सादरीकरणात प्रामुख्याने प्रकल्पाबाबत खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या.

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहीती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, सिमा, अक्षांश-रेखांश, नकाशा, बुडीत क्षेत्र, लाभ क्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्टय, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमिन वापर, भुकंप स्थिरता
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतकऱ्यांचा प्रकल्पामुळे होणारा विकास
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषन
- हवा,पाणी,जमिन,ध्वनी,विस्थापन इत्यादी बाबतची माहीती.
- नियोजीत प्रकल्पामुळे हवा, पाणी, विस्थापन, जैवविविधता यावर होणारे परिणाम व्यवस्थापन.
- प्रकल्प चालु झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहीती.
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहीती.

प्रकल्पधारकाने पर्यावरण विषयीची सविस्तर माहीती दिल्यानंतर सुनावणीचे समन्वयक यांनी सांगितले की, सदर जनसुनावणीत ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही पद्धतीने घेण्यात येत आहे. ऑनलाईन सहभाग घेण्याऱ्या व्यक्तींकरीता Cisco Webex प्रणालीव्दारे TV Screen वर व्यवस्था करण्यात आलेली आहे. उपस्थितांना त्यांनी आवाहन केले की, यानंतर आक्षेप/सुचना/प्रश्न व उत्तरे घेतले जातील व विनंती केली की, सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक प्रश्न विचारावेत व त्यांचे समर्पक उत्तर प्रकल्प धारकाने द्यावे.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) <u>श्री. नेताम (DMO) :-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | | या जनसुनावणीत आपले मुद्दे ऐकूण घेवून शासनास कळविण्यात येतील. जिल्हा स्तरावर सुध्दा समस्या सोडविण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| | | रेती घाटांचे नावे व क्षेत्रफळ यांची माहीती दिली. इंग्रजी व मराठी वृत्तपत्रांमध्ये जाहीरात दिली होती. रेतीचा ३ मीटर थर जसाच्या तसा ठेवून उर्वरीत रेती (थर) काढण्यात येईल. रेती उत्खनन सर्वेक्षणाच्या अभिप्राय नुसार होईल. जास्त रेती असली तरच काढण्यात येईल. राष्ट्रीय बांधकाम प्रकल्प, राज्य बांधकाम प्रकल्प व घर बांधकामासाठी नियमानुसार रेती मिळावी व शासनास महसूल मिळावा हा लिलावाचा उद्देश आहे. शासकीय जमीन बाबत २००९ च्या नियमानुसार/शासनिर्णयाच्या अधिन राहून उत्खनन करण्यात येईल. गोंडपिंपरी तालुक्यातील रेती घाटांची माहीती ज्यामध्ये नाव, क्षेत्रफळ व संख्या सांगण्यात आली. २४०८३५ ब्रॉस रेतीचे उत्खनन केले जाईल ज्याची एकूण ऑफसेट कींमत रुपये ४२६६८८४० एवढी निश्चित केली आहे.<br>महाराष्ट्र शासन वाळू रेती धोरण प्रमाणे अंतर, लांबी, रुंदी ठरवली आहे. सदर रेती उत्खननासाठी स्फोटकांची गरज नाही. खोलीच्या बाबतीत भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे ०.५ मीटर ते १ मीटर च्या दरम्यान रेती उत्खननास मंजूरी असेल. नदी पात्रातून रेती वाहतुकीसाठी फक्त ट्रॅक्टर वापरण्यास मंजूरी असेल. इशारा फलक लावणे, सुरक्षा व्यवस्था यांची जबाबदारी, लिलावधारकाची असेल. रस्त्यावर वॉटर स्प्रिंकलिंग, रस्त्याचे देखभाल याची जबाबदारी लिवावधारकाची असेल, अतीभार वाहतुकीस परवानगी नाही. रेती वाहतुकीसाठी PUC झालेली व १५ वर्षापेक्षा कमी कालावधीची वाहने वापरणे बंधनकारक असेल. दि. ०३/०९/२०१९ च्या शासन निर्णया नुसार रेती उपसा हा फक्त दिवसाच करण्याची परवानगी राहील. |

**ऑनलाईन उपस्थितांनी केलेले प्रश्न व त्यांची उत्तरे खालील प्रमाणे आहेत.**

**२) श्री. हरीभाउ येनगंटीवार (सरपंच, बोरचांदली) :-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वाळू उपसा संबंधित शासनाचे निकष/नियम ग्रामपंचायतींना उपलब्ध करुन देण्यात यावे. | DMO (श्री. नेताम) यांनी सांगितले की - वाळू उपसा संबंधित माहिती दि. ०३/०९/२०१९ च्या शासन निर्णय GR मध्ये नमूद आहे. सदर शासन निर्णय, शासनाच्या संकेतस्थळावर (शासननिर्णय) उपलब्ध असून सविस्तर नियमावली दिलेली आहे. संकेत स्थळावरुन माहिती काढण्यास अडचण असेल तर आमच्या कार्यालयात सदर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. |

**३) श्री. संजय तीपरट (चंद्रपूर):-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर रेतीघाट लिलाव जनसुनावणी कोणत्या धोरणाला अनुसरुन आहे? | DMO (श्री. नेताम) यांनी सांगितले की - सदर जनसुनावणी पर्यावरण व वन मंत्रालय (MoEF) च्या दि. १४/०९/२००६ व सुधारीत ०१/१२/२००९ च्या प्रसिद्धी पत्रकानुसार घेण्यात येत आहे.<br>समन्वयक (श्री. भादुले) यांनी सांगितले की - सदर जनसुनावणी पर्यावरण व वन मंत्रालय (MoEF) च्या दि. १४/०९/२००६ व सुधारीत ०१/१२/२००९ च्या प्रसिद्धी पत्रकानुसार घेण्यात येत आहे. तसेच या जनसुनावणी बाबतची जाहीरात दि. २४/१२/२०२१ रोजीच्या मराठी दैनिक "लोकमत" व इंग्रजी दैनिक "द टाईम्स ऑफ इंडिया" या वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द केली. जाहीराती मध्ये दिलेल्या |

| | | |
|---|---|---|
| | | कार्यालयांमध्ये जनतेला अभ्यासण्या साठी प्रकल्पाचे माहीती पुस्तक (EIA, EMP, summary) ३० दिवस ठेवण्यात आले होते. |
| २) | रेतीचे खणन एक मीटर अथवा तीन मीटर यापैकी खरे काय? ३ मीटर न काढता जास्त काढता. | DMO (श्री. नेताम) यांनी सांगितले की - शासन निर्णयाप्रमाणे रेती खणन एक मीटर ते तीन मीटर करता येते. भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा व तालुका स्तरीय तांत्रिक उपसमिती व्दारे सर्वेक्षणानुसार उपलब्ध वाळूसाठयाच्या तीन मीटरच्या वरील वाळू उत्खननास मंजूरी असेल. जर वाळू साठा ३.५ मी. असेल तर ३ मी. चा थर जसाच्या तसा ठेवून वरील ०.५ मी. वाळूसाठा उत्खननास मंजूरी असेल. |
| ३) | अंधारी नदी बाबतीत अयोग्य सर्वेक्षण झाले, अंधारी नदीच्या ४२ मीटर पात्रात कुठेही १ मीटरच्या वर रेती साठा उपलब्ध नाही. सर्वेक्षणात Ground water table, GSDA Data, HFL, Ground water level चा कुठेही समावेश नाही. जर अंधारी नदी पात्रात कुठेही २ मी., ३ मी. इतका वाळूसाठा उपलब्ध असता तर नदीच्या सभोवताल जंगलात पूर परिस्थिती निर्माण होवूर जंगलातील जनावरे बाहेर आली असती. | DMO (श्री. नेताम) यांनी सांगितले की - आपल्या सुचनेनुसार सर्व नदयांच्या बाबतीत फेर पडताळणी केल्या जाईल. |

४) **<u>श्री. संदिप मेश्राम (चंद्रपूर):-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर जनसुनावणी हे नियमबाहय असून २०१९ चे धोरण रद्द झाले आहे म्हणून ही जनसुनावणी अवैध आहे. नविन रेती धोरणाचे अनुपालन झाले नाही. | DMO (श्री. नेताम) यांनी सांगितले की - दि. ०३/०९/२०१९ चा शासन निर्णय रद्द झाल्याबाबत अदयाप कोणतीही अधिसुचना किंवा पत्रक आलेले नाही. जो पर्यंत लेखी अधिसुचना येत नाही |

| | | |
|---|---|---|
| | | तोपर्यंत जुने २०१९ चे धोरणाचे अनुपालन केले जाईल. केंद्र शासनाच्या Sustainable Sand Mining २०१६, २०१८( Sand Mining Framework) नुसार जनसुनावणी बंधनकारक आहे. तसेच जुने अथवा नविन धोरणात जनसुनावणी बंधनकारक असते. फेब्रुवारी २०२१ च्या अधिसुचनेनुसार जनसुनावणी बंधनकारक आहे. म्हणून जनसुनावणीची प्रक्रीया पूर्ण करण्यात येत आहे. |
| २) | सदर जनसुनावणी दि. १४/०९/२००६ चे अधिसुचना व त्यातील सुधारणा नुसार घेत असाल तर संबंधित कागदपत्रे दाखविण्यात यावी. | DMO (श्री. नेताम) यांनी सांगितले की - संबंधित कागदपत्रे कार्यालयात उपलब्ध आहेत. सल्लागार (श्री. शर्मा) यांनी सांगितले की, पर्यावरण व वन मंत्रालय च्या १४/०९/२००६ च्या अधिसुचनेचे अनुपालन करण्यात आलेले आहे. |
| ३) | जनसुनावणी घेण्याबाबत EIA अधिसुचना व त्यातील सुधारणा यात नुमूद नसून आपण राज्य सरकारच्या आदेशानुसार सदर जनसुनावणी घेत आहात. EIA अधिसुचना व त्यातील सुधारणा आताच्या आता दाखविण्यात यावी. | DMO (श्री. नेताम) यांनी सांगितले की - तसे लेखी निवेदन दयावे व EIA अधिसुचना व त्यातील सुधारणा कार्यालयातून प्राप्त होतील. पर्यावरण व वन मंत्रालय च्या १४/०९/२००६ चे व सुधारीत ०१/१२/२००९ च्या अधिसुचने नुसार जनसुनावणी घेण्यात येत आहे. |
| ४) | DSR वेब साईटवर अपलोड झालेला नाही? DSR चा कालावधी ७/०१/२०२० ते ८/०४/२०२० असून त्या DSR मध्ये नवीन रेतीघाटांची नोंद नाही तसेच DSR वेब साईटवर अपलोड झालेला नाही. | DMO (श्री. नेताम) यांनी सांगितले की – तुमच्या सुचनेची नोंद घेण्यात आली आहे. |
| ५) | अंधारी नदी महत्वाची नदी असून त्याबद्दल DSR मध्ये काहीही माहीती नमूद नाही तसेच अजयपूर रेती घाट कोर झोन मध्ये येतो. | DMO (श्री. नेताम) यांनी सांगितले की - कोणताही रेती घाट कोर झोन कींवा बफर झोन मध्ये येत नाही, तसे असल्यास त्याची नोंद घेवून पुन:तपासणी करण्यात येईल तसेच चर्चेतील कोणताही रेतीघाट अदयाप अंतीम झालेला नाही |
| ६) | सध्याच्या DSR मध्ये Reclaimation बद्दल | DMO (श्री. नेताम) यांनी सांगितले |

| | | |
|---|---|---|
| | कोणताच उल्लेख नाही. SSM मध्ये नमुद कोणत्याही मेथडचा कुठेच उल्लेख नाही अथवा कागद पत्रे नाही. PPT मध्ये उल्लेख नाही. कोणत्या मेथडचा उपयोग केला? | की - सध्याच्या माइनिंग प्लान व DSR मध्ये या सर्वबाबींचा उल्लेख आहे. आपल्या सुचनेची नोंद घेण्यात आली आहे. |
| ७) | अंधारी नदी ही चंद्रपूर जिल्हयातील जनावरांकरीता प्राणहीता असून त्याबद्दल DSR मध्ये काहीही माहीती नमूद नाही तसेच अजयपूर रेती घाट कोर झोन मध्ये येतो. | सल्लागार (श्री. शर्मा) यांनी सांगितले की, प्राणहीता नदी चंद्रपूर जिल्हयात येत नाही. |
| ८) | आपल्या EMP मध्ये Base Line Data नाही, DSR संकेतस्थळावर upload नाही. हे सर्व मुद्दे इतीवृत्तात जसेच्या तसे नोंद करण्यात यावे ही माझी अध्यक्षांना विनंती आहे. | DMO (श्री. नेताम) यांनी सांगितले की - आपल्या सुचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

**प्रत्यक्ष उपस्थितांनी केलेले प्रश्न व त्यांची उत्तरे खालील प्रमाणे आहेत.**

५) **श्री. व्ही. सुनंदा रेड्डी पर्यावरणवादी :-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | मी पर्यावरणवादी आहे व माझा या जनसुनावणीस पाठींबा आहे. माझा ३५ वर्षाचा अनुभव पर्यावरणात आहे. माझ्या अनुभवानुसार दरवर्षी पावसामुळे अनमोल असलेली मृदा पाण्यासोबत नदीत वाहून जाते ज्यात २०% रेती असते व पुढे उत्तरोत्तर ती वाहून वाया जाते म्हणून ही रेती नदीतून काढणे खूप गरजेचे आहे. ही रेती नदीत साठवल्या जावू शकत नाही. ही वाहून जाणारी रेती योग्य रीत्या उत्खनन केल्यास त्याचा वापर राज्य सरकार, केंद्रसरकार व इतर विकास कामांत होवू शकतो त्यामुळे रोजगार निर्मितीस हातभार लागू शकतो. नदीतून रेती काढल्यास अधिक पाणी साठवून ठेवू शकतो ज्यामुळे पाणी पातळीतही वाढ होते. रेती उत्खननातून मिळणाऱ्या महसूलातून जवळपासच्या गावात, नदीपात्रात वृक्षारोपण होवू शकते. मी प्रकल्प | DMO (श्री. नेताम) यांनी सांगितले की - आपल्या सुचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावकांचे अभिनंदन करतो, व विनाअट पाठींबा देतो. | |

**६) श्री. कृष्णा मुर्थी (हैद्राबाद) :-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | माझा या जनसुनावणीस पाठींबा असून संबंधित मंत्रालयास पर्यावरण मंजूरी देण्याची विनंती करतो. | DMO (श्री. नेताम) यांनी सांगितले की - आपल्या सुचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

**७) शेतकरी, राजूरा :-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | माझी शेती नदी काठी असून घाटाच्या भोवती कुंपण केल्याचे कुठेही आढळून आले नाही. | DMO (श्री. नेताम) यांनी सांगितले की - आपल्या सुचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

**८) ग्रामपंचायत, उसेगाव :-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत उसेगाव ने हा लिलाव ग्रामसभेत नाकारला आहे. | DMO (श्री. नेताम) यांनी सांगितले की - आपल्या सुचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

**९) जनसुनावणी समन्वयक :-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | | समन्वयक (श्री. भादुले) यांनी जनसुनावणी समितीस सांगितले की - रेती घाट लिलाव प्रक्रीया मा. हरीत लवाद यांच्या आदेशाच्या अधिन राहून व्हावी. |

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी ऑनलाईन व ऑफलाईन उपस्थित असलेल्या नागरीकांना आणखी काही प्रश्न/आक्षेप/सूचना असतील तर विचारण्याचे आव्हान केले. मात्र कोणीही तद्नंतर प्रश्न/सूचना/आक्षेप उपस्थित केले नाहीत. त्यानंतर सदस्य पर्यावरण जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, बैठकीत करण्यात आलेल्या सूचना, आक्षेपांची नोंद घेण्यात आली असून त्याचे ईतिवृत्त व रेकॉर्डींग शासनास पुढील कारवाई करीता पाठविण्यात येईल. समन्वयक यांनी प्रश्न उपस्थित करणाऱ्या लोकांची नावे सभेत वाचून दाखविली.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना जनसुनावणीतील उपस्थित झालेल्याबाबींचा आढावा घेऊन उपस्थितांचे आभार मानून जाहीर जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.

**(उमाशंकर भ. भादुले)**
समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा प्रभारी उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

**(अ. मा. करे)**
सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

**(विशालकुमार मेश्राम)**
अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर